# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-१७८** **दिनांक - ०८/०५/२०२४**

**गहाळ झालेले मोबाईल फोनचा तपास करुन एकूण १०,७१,७९९/- रुपये किंमतीचे ५६ मोबाईल फोन नागरीकांना परत करण्यास नालासोपारा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.**

नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील रहीवाशांचे मोबाईल फोन मिसिंग/गहाळ होण्याचे प्रमाण वाढले होते. त्याअनुशंगाने मा.वरीष्ठांनी गहाळ/मिसिंग झालेल्या मोबाईलचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या होत्या. मा.वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी नालासोपारा पोलीस ठाणेचा मिसिंग/गहाळ मोबाईलचा तपास हाती घेतला होता.

नालासोपारा पोलीस ठाणे दाखल मिसिंग/गहाळ मधील मोबाईल फोनचे कौशल्याने व तांत्रिक माहीतीच्या आधारे विश्लेषण करुन वेगवेगळया वेगवेगळया राज्यांमधून तसेच महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळया जिल्हयांमधून एकूण १०,७१,७९९/- रुपये किंमतीचे वेगवेगळया कंपनीचे एकूण ५६ मोबाईल फोनचा शोध घेऊन ते प्राप्त करण्यास गुन्हे प्रकटीकरण पथकास यश प्राप्त झाले असून, नमुद मोबाईल फोन नागरीकांना परत करण्यात आलेले आहेत.

सदरची कामगिरी जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, विजय लगारे, सहा. पो.आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाखाली विजयसिंह बागल, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, सचिन कोतमिरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/राजेंद्र चंदनकर, पो.उपनिरी./योगेश मोरे, सफौ/९५०३६ हिरालाल निकुंभ, पोहवा/०३०६२ किशोर धनु, पोहवा/०४००७ प्रशांत साळुंके, पोना/०३०६३ अमोल तटकरे, पोशि/१६०५२ कल्याण बाचकर, पोशि/१६०६५ राजेश नाटुलकर, पोशि/१७००६ प्रेम घोडेराव तसेच पोलीस उप आयुक्त कार्यालय, परीमंडळ ३, विरार कार्यालयातील पोहवा/१२००१ नामदेव ढोणे, पोशि/२२०३० सोहेल शेख यांनी केलेली आहे.